उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
'वनभवन', गोडोली रोपवाटीका, सातारा ४१५ ००१
☎ (०२१६२)२२००५८, फॅक्स : (०२१६२) २२००५९ ईमेल : forest.satara68@gmail.com

जा. क्र. ब/जमीन/प्र.क्र.२२/२०१७.१८/
सातारा,दिनांक: /१२/२०१८.

प्रति,

जनरल मॅनेजर (टेक),
प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
स.नं. १३४/१, बायफभवन, कॅम्पस,
वारजे, पुणे.

**विषय** - construction of new six lane tunnel at khambataki Ghat section of NH-4 and is aproaches from existion km-771.730 to existion km 782.000 in the state of Maharashtra - Submission of tree enumeration Data - reg.

**संदर्भ** - भारत सरकार, पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र. FC-II/MH-90/2018-NGP/4624 दिनांक २६/११/२०१८.

आपलेकडील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पुणे - सातारा खंबाटकी घाट नवीन बोगदा (Ex. KM 771.730 to Ex. 782.000) साठी लागणा-या ७.२६ हे. वनजमीन मागणी प्रस्तावास केंद्रशासनाने वरील संदर्भिय पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कलम २ नुसार काही अटींवर तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्याची प्रत यासोबत जोडुन पाठविली आहे. तरी केंद्रशासनाने पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपले विभागाशी संबंधीत अटींची पुर्तता अहवाल आवश्यक कागदपत्रे प्रमाणपत्रासह आंग्ल भाषेत त्वरीत सादर करावा. सदर अटीं पुर्तता अहवाल शासनास सादर झाल्यावर त्यास अंतिम मंजुरी प्राप्त होईल. अटींचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे आहे.

१. वनजमीनीचा वैधानिक दर्जा बदलणेचा नाही.
२. वनविभागामार्फत १५ हे. अवनत (मौजे पांडेवाडी, ता. वाई स.नं. १९ पार्ट मधील ५.०० हे. व मौजे हराळी, ता. खंडाळा फॉ. कं. नं. १४५ मधील १०.०० हे.) वनजमीनीवर पर्यायी वनीकरण घेण्यात येईल.
३. प्रकल्प यंत्रणेने अवनत वनजमीनीवर पर्यायी वनीकरण करण्यासाठी रक्कम रु. १,०६,९४,६७६/- भरणा केली पाहिजे.
४. मा. उच्च न्यायालय यांनी W.P.(civil) no. 202/1995 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार व केंद्रशासनाचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्रकल्पासाठी दिलेल्या वनजमीनीचे नक्त मुल्य किंमत रक्कम रु. ४५,४४,७६०/- (NPV) भरणा केली पाहिजे.

५. नक्त मुल्य किंमत (NPV) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडुन वाढ झाल्यास वाढीव रक्कम भरण्यास तयार असलेबद्दल हमीपत्र (Undertaking) दिले पाहिजे.

६. प्रकल्प यंत्रणेकडुन प्राप्त झालेला सर्व निधी राज्य शासनाचे CAMPA अंतर्गत सेव्हिंग खात्यामध्ये वर्ग केला पाहिजे.

७. पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ नुसार पर्यावरण ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असलेस प्राप्त करुन सादर केले पाहिजे.

८. प्रकल्पासाठी वळतेकरण केलेले वनजमीनीचे हद्दीवर ४ फुट उंचीचे सिमेंट पिलर, अनुक्रमांक दर्शक, तसेच Forward and Back bearing and distance from pillar to pillar दर्शक माहिती दर्शविणारे पिलर प्रकल्प यंत्रणेने त्यांचे खर्चाने लावले पाहिजेत.

९. प्रकल्पासाठी वळतीकरण केलेल्या क्षेत्रामध्ये जेथे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे, तेथे रस्त्याचे बाजुने वृक्षलागवड केली पाहिजे.

१०. वनजमीनीचा उतार स्थिर ठेवणेसाठी रिटेनिंग वॉल, ब्रेस्टवॉल, नाले इत्यादी आवश्यक त्या ठिकाणी घातले पाहिजेत.

११. वनविभागाचे मार्गदर्शनानुसार मृदासंधारणाची कामे प्रकल्प यंत्रणेने त्यांचे स्वखर्चाने केली पाहिजेत.

१२. नैसर्गिक उतार, नैसर्गिक पाण्याचे साठे यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. वन्यप्राण्याचे वर्दळीस अडथळा करता येणार नाही.

१३. वनजमीनीवर मजुरांचे वास्तव्य करता येणार नाही.

१४. प्रकल्पावर काम करणा-या मजुरांना आणि कामगारांकडुन वनक्षेत्रास धोका पोहचु नये, यासाठी पर्यायी इंधन पुरवठा केला पाहिजे

15. All structures proposed for crossing in the forest patches should be of box culverts type with optimum hight. Provisions of guided fencing, in consultation with the State Forest Department, shall be provided on either side of such culverts upto a length of 100 meters to guide the wildlife to cross the road through the proposed road crossing only.

16. Portion of the existing road (corresponding to re-alignment) falling in the forest land should be dismantled and planted with trees at the cost of the User Agency.

१७. प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कारणा व्यतिरिक्त इतर कारणासाठी वनजमीनीचा वापर करता येणार नाही.

१८. केंद्रशासनाचे परवानगी शिवाय प्रस्तावातील ले आऊट प्लॅनमध्ये बदल करता येणार नाही.

Scanned by CamScanner

१९. केंद्रशासनाचे परवानगी शिवाय प्रस्तावासाठी मंजुर केलेली वनजमीनं इतर कोणत्याही यंत्रणेला विभागाला किंवा व्यक्तीला हस्तांतरित करता येणार नाही.

२०. प्रकल्पा लगतचे वनक्षेत्रावर वनस्पती व वन्यप्राण्यांना धोका पोहोचता कामा नये.

२१. प्रकल्पाचे खोदकाम केलेले मटेरियलचे वाहतुकीचे काम करताना लगतचे वनजमीनीतुन अतिरिक्त अगर जादा मार्ग काढता येणार नाही.

२२. प्रकल्प यंत्रणेने त्यांचे खर्चाने बोगद्याचे प्रवेश व बाहेर ठिकाणी मोकळ्या जागेत योग्यते कुंपन घातले पाहिजे.

२३. प्रकल्प क्षेत्रात १२९ झाडे तोड प्रस्तावित आहे, परंतु वृक्षतोड ही कमीत कमी व आवश्यक तेवढीच वनविभागाकडुन करण्यात येईल. शक्यते वृक्षांची पुर्नलागवड वनविभागाचे मार्गदर्शनानुसार करण्यात यावी. वृक्षतोडीसाठी रुपये ८९९९९५/- खर्च अपेक्षीत असुन सदर रक्कम उपवनसंरक्षक, सातारा वनविभाग, सातारा यांचे नावे (Dy. Conservator of Forest, Satara Forest Division Satara) वेगळ्या डिमांडड्राफ्टने जमा करावयाचा आहे.

२४. अ) The tunnel will be laid well below as per norms from the ground level all along its length through fores.

ब) प्रकल्प यंत्रणेने त्यांचे खर्चाने वनविभागास (वन्यप्राणी बचाव केंद्र) Animal Rescue Centre बांधुन दिले पाहिजे.

२५. केंद्रशासनाचे दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार लगतच्या वनक्षेत्रातील झाडावर पक्षांसाठी कृत्रिम घरटी बसविली पाहिजेत व तसा अहवाल वनविभागास दिला पाहिजे.

२६. आदिवासी व जंगलवासी कायदा २००६ अंतर्गत जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडुन प्राप्त झालेले मुळ प्रमाणपत्र सादर करावे.

२७. Part - II Copy ची प्रत सादर करावे.

२८. पर्यायी क्षेत्राचे जीपीएस नकाशे, केएमएल/ शेफ फाईल सादर करणे.

२९. फार्म A पार्ट १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे रोजगार उपलब्ध संदर्भात योग्यते प्रमाणपत्र देणे.

३०. तोड करावयांचे वृक्षांची पुन्हा मोजणी करुन त्याची यादी सादर करावी.

३१. प्रकल्प यंत्रणेने कामाचा सहामाही प्रगती अहवाल १ जानेवारी व १ जुलैला केंद्रशासनास, केंद्रस्थ अधिकारी, व या कार्यालयास सादर केला पाहिजे.

३२. राज्यशासनाकडुन दरवर्षी ३१ डिसेंबर ला वन संवर्धना विषय संनियंत्रण अहवाल सादर करणे.

३३. शासनाकडुन वृक्षसंवर्धन व वन्यजीव संरक्षण संदर्भात वेळोवेळी ज्या अटी / शर्ती घातल्या जातील त्या बांधणकारक राहतील.

३४. राज्य शासनाने या संदर्भात जे कायद्ये, नियमावली आणि मार्गदर्शक सुचना आहेत, त्या प्रकल्प यंत्रणेला बंधनकारक राहतील.

३५. पर्यावरण व वन मंत्रालय, यांचेकडील दिनांक २८/०८/२०१५ चे मार्गदर्शक तरतुदीनुसार काम करण्यास परवानगी राज्यशासनाकडुन दिली जाईल.

३६. वनकर्मचा-यांचे खाजगी वाहनांना त्यांचे ओळखपत्राचे आधारे टोलनाक्यावर टोल मधुन सुट देण्यात यावी.

केंद्रशासनाचे अटींचा वर थोडक्यात तपशील दिला आहे. तरी केंद्रशासनाचे पत्रात नमुद केलेल्या सर्व अटीं प्रमाणे आंग्ल भाषेत (English) अटीनिहाय सर्व अटींचा अटी पुर्तता अहवाल सादर करावा. पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम व नक्त मुल्य रक्कम (NPV) E-portal पध्दतीने CAMPA, Corporation Bank, New Delhi यांचे खात्यावर रक्कम वर्ग करावयाची आहे.वृक्षतोडीसाठी लागणारी रक्कम ही उपवनसंरक्षक, सातारा वनविभाग, सातारा (Dy. Conservator of Forest, Satara Forest Division, Satara) यांचे नावे वेगळ्याने डिमांड ड्राफ्टने या कार्यालयास जमा करावयाची आहे.

सोबत - केंद्रशासनाचे पत्राची छायांकीत प्रत

(डॉ. भारत सिंह हाडा)
उपवनसंरक्षक
सातारा वन विभाग सातारा.

प्रतिलिपी - मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांना संदर्भीय पत्रांसह माहितीसाठी सविनय सादर.

प्रत - सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव), (वनीकरण), सातारा यांना संदर्भीय पत्रांसह माहितीसाठी.

प्रत - वनक्षेत्रपाल, खंडाळा / वाई यांना माहितीसाठी व नोंद घेणेकामी.
सोबत केंद्रशासनाचे पत्र पाठविली आहे. तरी आपले विभागाशी संबंधीत अटी संदर्भात तसेच पर्यायी वनीकरणाचे GPS Polygon, KML file सादर करावी, तोडकरावी लागणा-या वृक्षांची पुन्हा मोजणी करुन अहवाल तात्काळ सादर करावे.

प्रत - वनसर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय यांना माहितीसाठी.
सोबत केंद्रशासनाचे पत्राची छायांकीत प्रत पाठविली आहे. तरी त्याप्रमाणे योग्यती नोंद घ्यावी.

प्रत - लेखापाल, लेखा कक्ष विभागीय कार्यालय यांना माहितीसाठी.
सोबत केंद्रशासनाचे पत्राची छायांकीत प्रत पाठविली आहे. तरी त्याप्रमाणे योग्यती नोंद घ्यावी.

प्रत - लेखापाल, योजना कक्ष विभागीय कार्यालय यांना माहितीसाठी.
सोबत केंद्रशासनाचे पत्राची छायांकीत प्रत पाठविली आहे. तरी त्याप्रमाणे योग्यती नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

## सातारा वनविभाग, सातारा

## राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पुणे-सातारा खंबाटकी घाट नवीन बोगदा क्षेत्र - ७.२६ हे.

## भरणा करावयाचे रक्कमेचा तपशिल

| अ. क्र. | तपशील | परिमाण | दर | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यायी वनीकरण | १५. हे. | अंदाजपत्रकाप्रमाणे | १,०६,९४,६७६/- | सदर रक्कम E-Portal ने CAMPA चे Corporation Bank, New Delhi चे खात्यावर खाते क्र. 0371001010-25218 IFSC Code -CORP000371 जमा करावी. |
| २ | नक्त मुल्य रक्कम (NPV) | ७.२६ हे. | ६,२६,०००/- प्रति हेक्टर | ४५,४४,७६०/- | |
| | | | एकुण | १,५२,३९,४३६/- | |
| ३ | वृक्षतोड करणे | १२९ वृक्ष | अंदाजपत्रकाप्रमाणे | ८९,९९५/- | सदर रक्कम उपवनसंरक्षक, सातारा वनविभाग, सातारा (Dy. Conservator of Forest, Satara Forest Divison, Satara) यांचे नावे वेगळ्याने डिमांडड्राफ्टने देणेची आहे. |

(डॉ. भारत सिंह हाडा)
उपवनसंरक्षक
सातारा वन विभाग सातारा.